—: प्रेसनोट :— दिनांक : ०१/१०/२०१८

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३२/२०१८ |
| कलम | कलम ७, ७ (अ) १२ भ्र.प्र.अधिनियम (सुधारीत — २०१८) |
| आरोपी व कार्यालय | १)तुषार जयराम सावरकर, वय ३४ वर्षे, समाजसेवा अधिक्षक, महाराष्ट्र शासन, कार्यालयाचा पत्ता — ग्रँन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व सर जे.जे. समूह रुग्णालये, मुंबई—४०० ००८.<br>२)सचिन शंकर साळवे, वय ३२ वर्षे, पद—ट्रान्सप्लान्ट को—ऑर्डीनेटर (समन्वयक) खाजगी इसम, कार्यालयाचा पत्ता — एस.एल.रहेजा हॉस्पिटल, रहेजा रुग्णालय मार्ग, माहीम (पश्चिम), मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. १,५०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ८०,०००/— |
| हस्तगत रक्कम | रू. ८०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांच्या मित्राच्या दोन्ही किडण्या निकामी झाल्या असल्याने त्यांच्या मेव्हण्याचे पत्नीने स्वतःची एक किडणी देण्याची तयारी दर्शविली. फिर्यादी यांच्या मित्राचे किडणीचे ऑपरेशन एस.एल.रहेजा हॉस्पिटल, माहीम, मुंबई येथे होणार आहे. त्याकरीता सदरची फाईल रहेजा हॉस्पिटल यांचे मार्फतीने जे.जे. हॉस्पिटल येथे किडनी ट्रान्सप्लान्ट ऑफिसमध्ये कायदेशीर परवानगी मिळणेकरीता पाठविण्यात आली होती.<br><br>एस.एल.रहेजा हॉस्पिटल मधील ट्रान्सप्लान्ट को—ऑर्डीनेटर सचिन साळवे यांनी फिर्यादींच्या मित्राच्या किडणी ट्रान्सप्लान्टकरीता आवश्यक असलेल्या परवानगीकरीता जे.जे. हॉस्पिटल मधील श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक, यांना लाच स्वरुपात रु. १,५०,०००/— इतकी रक्कम दयावी लागेल असे सांगितले.<br><br>फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या कार्यालयात तक्रार दिली. त्यानुसार पडताळणी दरम्यान सचिन साळवे यांनी रु. १,५०,०००/— ची मागणी केली व तडजोडीअंती फिर्यादी यांना रु. ८०,०००/— इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करुन दि. ०१/१०/२०१८ रोजी रु. ८०,०००/— इतक्या लाचेची रक्कम घेवून जे.जे. हॉस्पिटल, मुंबई येथे येण्यास सांगितले.<br><br>त्यानंतर दि. ०१/१०/२०१८ रोजी श्री. सचिन साळवे, ट्रान्सप्लान्ट को—ऑर्डीनेटर (समन्वयक), एस.एल.रहेजा हॉस्पिटल, माहीम यांनी जे.जे.हॉस्पिटल येथील आलोसे तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक यांच्या कार्यालयात आलोसे यांचेवतीने फिर्यादीकडून रु. ८०,०००/— इतकी लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती स्विकारली असता त्यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.
टोलफ्री क्र.१०६४,दूरध्वनी क्र.०२२—२४९२१२१२,फॅक्स क्र.०२२—२४९२२६१८,
वेबसाईट — acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक - www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
व्हॉटस् ॲप क्रमांक — ९९३०९९७७००

सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि.,मुंबई विभाग, मुंबई.

सहाय्यक पोलीस आयुक्त ★ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ★